# प्रादेशिक कादंबरी : स्वरूप व संकल्पना

(Reginal Novel: Appearance & Concept)

डॉ. रा.तु. आदे
सहयोगी प्राध्यापक,
इंदिरा महाविद्यालय, कळंब
जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
rajuade2512@gmail.com भ्रमणध्वनी 9422608715

सारांश

मराठी साहित्यामध्ये आधुनिक काळात अनेक वाङ्मयीन प्रवाह गतिमान झालेले दिसतात. व्यक्तित्वाचे समग्र दर्शन घडवत असल्यामुळे कादंबरी हा प्रकार रसिकांमध्ये लोकप्रिय झाला. वर्णनात्मकता, प्रदेश व निसर्ग वर्णनाला अवसर व प्रादेशिक जीवन वास्तवाचे चित्रण हे प्रादेशिक साहित्याचे उद्दिष्ट मानले जाते. लोकसंस्कृती व लोकजीवनाला प्राधान्य देणाऱ्या प्रादेशिक साहित्यामध्ये विशिष्ट प्रदेशाचे सर्वांगीण दर्शन घडवले जाते. विशिष्ट प्रदेशाचा लोकजीवनावरील प्रभाव टिपणे हे प्रादेशिक साहित्यात महत्त्वाचे मानले जाते. प्रदेशातील चालीरीती, व्रतवैकल्ये, सण-उत्सव, प्रादेशिक मूल्ये यांना या प्रकारात महत्त्व प्राप्त होते. विशिष्ट भूभाग, निसर्ग, माणसे त्यांच्या समजुती, चालीरीती, बोलीभाषा, दैवते यांच्या गुणविशेषांसह प्रादेशिक कादंबरी उभी राहिली. प्रादेशिक कादंबरी ही प्रादेशिकतेच्या रंग गंधांनी माखलेली असते. प्रादेशिक साहित्य हे समूहनिष्ठ असल्याने त्यातून समूहाच्या जीवनजाणिवा अभिव्यक्त होतात.

## Abstract

Many literary streams appear to be moving in Marathi Literature in modern time. Because of the overall appearance of the personality, Regional novel become popular among the people. The descriptiveness of the region and nature is described as an opportunity and the depiction of regional life reality is the object of regional Literature. The regional literature that prioritizes folk Culture and people's lives is given a holistic view of the particular region. The influence of life on a particular region is considered important in the regional literature. A regional novel with the characteristics of certain terrain, nature, people, their beliefs, customs, dialects, and deities emerged. The regional novel is filled with the smells of regionalism. Since regional literature is grouped, it expresses the life of the group.

बीज शब्द - प्रादेशिक, सामाजिक, समूह, निसर्ग, बोलीभाषा, शिक्षण, जरठ-बालाविवाह

आधुनिक मराठी साहित्य प्रकारामध्ये अनेक वाङ्मयीन प्रवाह गतिमान झाले. ग्रामीण,स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी, दलित आणि प्रादेशिक या वाङ्मयीन प्रवाहात जोरकस लेखन व्हायला लागले. प्रादेशिक साहित्यातून प्रदेशाचा धमधमणारा सुवास दरवळला व आसमंत– प्रदेश गंधीत झाला. प्रदेशातील लोकजीवन, श्रध्दा, समजुती, सण–उत्सव हया बाबी लेखकाच्या औत्सुक्याच्या ठरल्या, त्यामधूनच प्रादेशिक साहित्य प्रकाराला मूर्त स्वरूप प्राप्त झाले. प्रादेशिक मराठी वाङ्मय कथा, कादंबरीमधून प्रामुख्याने साकार झाले. 'प्रदेशदर्शन' व 'निसर्गचित्रण' या बाबींना प्रादेशिक साहित्यात अत्यंत महत्वाचे स्थान प्राप्त झाले.

मराठी कादंबरीमध्ये वर्णनात्मकतेला विशेष अवसर असल्यामुळे घटना प्रसंगाच्या विस्तृत वर्णनाला या ठिकाणी संधी मिळाली व लेखकाची प्रतिभा त्यातून बोलकी झाली. मराठी प्रादेशिक कादंबरीमध्ये सुध्दा प्रदेश व निसर्गचित्रणाला प्राथम्य लाभले आहे. प्रादेशिक कादंबरीचा मुख्य उद्देश 'प्रादेशिक वास्तव जीवन' साकारणे हा असतो. वास्तवाला काल्पनिकतेचे अधिष्ठान देऊन प्रादेशिक कादंबरी साकारली आहे. लोकजीवन, प्रादेशिक कादंबरीच्या केंद्रस्थानी असते. कारण लोकांच्या जीवन जगण्याला येथे मूर्तरूप दिले जाते. लोकभावना ही समूहाशी संबंधित असल्यामुळे 'समूहचित्रण' हा प्रादेशिक कादंबरीचा प्रधान हेतू असतो. लोकसाहित्याचा स्पर्श प्रादेशिक कादंबरीला झालेला असतो. लोकजीवन व लोकसंस्कृतीच्या सर्व अंगोपांगाचा, तत्वाचां वापर प्रदेश जीवनाचे चित्र रेखाटताना प्रादेशिक कादंबरीकार करीत असतो.



Electronic copy available at: https://ssrn.com/abstract=3484328

''एखाद्या विशिष्ट प्रदेशाला किंवा टापूला कादंबरीची पार्श्वभूमी घेऊन कथानक लिहिले जाते, तेव्हा त्या कादंबरीला 'प्रादेशिक कादंबरी' म्हणतात.'' त्यातील घटना, व्यक्ती व वातावरण हे सर्व त्या प्रदेशाला साकार करते, त्यातून विशिष्ट व्यक्तींचे, त्यांच्या चालीरीतींचे, त्यांच्या सामाजिक नैतिक–धार्मिक–राजकीय–आर्थिक कल्पनांचे, त्यांच्या मनोधर्मांचे एक सबंध जाळे विणलेले असते. त्यात व्यक्ती वा समूहाला महत्व नसून प्रदेशाला महत्व असते. प्रादेशिक कादंबरीमध्ये कुठला तरी भूप्रदेश चित्रित होणे महत्वाचे मानले जाते. विशेषत: विदर्भ, मराठवाडा, खानदेश, माणदेश यातील प्रदेशचित्रण करणाऱ्या विपुल कादंबऱ्या मराठीमध्ये प्रसिध्द झालेल्या आहेत. त्या त्या प्रदेशाची वैशिष्टये या कादंबऱ्यामधून व्यक्त झालेली आहेत. केवळ भूप्रदेशाचे वर्णन म्हणजे प्रादेशिकता नव्हे, तर त्या प्रदेशाचा तेथील लोकजीवनावर झालेला परिणाम, त्या प्रदेशाची संस्कृती, रीतीरिवाज, यांचेही चित्रण त्यासाठी आवश्यक ठरते. मागासांच्या जगण्याच्या चालीरीती, सण,व्रतवैकल्ये इत्यादी त्या प्रदेशाशी निगडीत झालेल्या असतात.

मराठी साहित्यामध्ये फार पूर्वीपासून 'जानपदगीते' लिहिण्याचा प्रघात होता. ग्रामजीवनातील व्यक्तींचे सांस्कृतीक जीवन चित्रित करण्याचा प्रयत्न त्यातून होत असे. ग्रामजीवनाला साकारतानाच प्रादेशिक जीवनाकडे लक्ष वेधले गेले व निसर्ग सन्मुखतेने प्रादेशिक चित्रण व्हायला लागले. १९३५–४० च्या सुमारास मराठी कादंबरीने 'प्रादेशिक कादंबरी' चा नवीन उन्मेष प्रकटताना पाहिला. त्यामुळे एक नवीन पर्वणी हाताशी आल्याचा आनंद साहित्यविश्वात संचारला. १९३५ च्या सुमारास मराठी कादंबरी गतीशून्य होऊ पाहात होती. लेखक, कलावंतांनी निर्माण केलेले कलाविश्व पुनरावृत्त होऊ लागले होते. नाविण्याच्या अभावामुळे तीच ती पदे फिरून फिरून येत असल्याचा प्रत्यय सुजाण वाचकाला येऊ लागला होता. आदर्श व वास्तव हया तात्वीक द्वंद्वात कादंबरी गरगरा फिरत होती. अशा वेळी नवनिर्मितीची अपेक्षा बलवत्तर ठरू लागली. नवलेखकांची प्रतिक्रिया या विषयी बोलकी झाली. त्यांचे जीवनाविषयीचे अनुभवविश्व पारंपारिक चौकटीहून भिन्न होते. ते अधिक रसरशीत व जिवंत होते. सांकेतिक परिघापेक्षा वेगळया विचारसरणीची मांडणी ते करू लागले. त्यांच्या या विचाराला मूर्त स्वरूप लाभले व १९४० च्या सुमारास प्रादेशिक कादंबरीचा जन्म झाला.

मराठीत प्रादेशिक कादंबरीचा प्रवाह र. वा. दिघे, श्री.ना.पेंडसे यांच्यापासून सुरू होते. र.वा.दिघे, यांच्या 'पाणकळा' या लक्षणीय कादंबरीनंतर खऱ्या अर्थाने मराठीत प्रादेशिक कादंबरीला बहर आला. गो.नी.दांडेकर, श्री.ना.पेंडसे यांनी समकाळात महत्वाचे कादंबरी लेखन सुरू केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मराठीत ग्रामीण जीवनास विशेष महत्व प्राप्त झाले. ग्रामीण साहित्याकडे 'करमणुकीचे व मनोरंजनाचे साधन' म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन बदलून 'ग्रामीण जीवनाचे यथार्थ–वास्तव चित्र रेखाटणारे साहित्य म्हणून पाहिले जाऊ लागले. विविध प्रदेशातील व्यक्तींचे (विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, मुंबई, पुणे, माणदेश) भावनिक ऐक्य साधण्याचा प्रयत्न सुरू झाला. प्रादेशिक अस्मिता जोपासण्याचा प्रयत्नही या काळातच विशेष करून होऊ लागला.

मर्यादित भूभाग, मनोहारी निसर्ग, विविध स्वभावाची माणसे, त्यांच्या समजुती, चालीरिती, रूढी–परंपरा, त्यांच्या मनोवृत्ती, बोलीभाषा, त्यांची दैवते, या त्यांच्या गुणविशेषांसह प्रादेशिक कादंबरी उभी राहिली आहे. प्रादेशिक साहित्यामध्ये सामाजिक पर्यावरणासोबतच भौगोलिक पर्यावरणाला अत्यंत महत्वाचे स्थान असते. संबंध प्रदेशामध्ये जगत असलेल्या लोकांचा विचार प्रादेशिक कादंबरीमध्ये महत्वाचा मानला जातो. प्रादेशिक साहित्यामध्ये त्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा,शेती, समूह–भावना, त्या विशिष्ट प्रदेशातला निसर्ग या सर्वातून निर्माण झालेले प्रश्न व जीवननाटय यांचा प्रत्यय देण्याचा प्रयत्न प्रादेशिक साहित्यकृतीमधून विपूल प्रमाणात केला जातो. प्रादेशिक साहित्यामधून त्या विशिष्ट प्रदेशातील संस्कृती सामग्र्याने प्रकट झाल्याचा आपल्याला प्रत्यय येतो. प्रादेशिक साहित्यामध्ये समूहभावना केंद्रस्थानी असल्यामुळे 'समूह मनाचा गजर' प्रादेशिक कलाकृतीतून ऐकायला मिळतो.

प्रादेशिक साहित्यकृतीमध्ये व्यक्तीभोवतीचे वर्णन समष्टीचे रूप धारण करतांना दिसते. सामुदायिकतेला प्रादेशिक साहित्यामध्ये निरतिशय महत्व असले तरी येणारे अनुभव ग्रामजीवनाशी निगडीत असतात म्हणून ग्रामजीवनातील आर्थिक, सामाजिक, भौगोलिक, स्त्री–पुरूषविषयक प्रश्नांना कादंबरीत प्राधान्य लाभले असते. प्रादेशिक कादंबरी ही समग्रपणे प्रादेशिकतेच्या रंगगंधानी न्हाऊन–माखुन निघालेली असते. प्रदेशाच्या,त्यातील निसर्गाच्या, मानवी स्वभावाच्या खाणाखुणा अंगावर मिरवत प्रादेशिक कादंबरी अवतीर्ण झालेली असते. म्हणून तिचे स्वरूप ग्रामीण कादंबरीपेक्षा काही प्रमाणात भिन्न जाणवते.

प्रादेशिक साहित्याच्या संदर्भात अभ्यासकांची मते भिन्न–भिन्न आहेत. त्यांच्या विचारांचा मागोवा घेणे विषयोचित ठरेल. द.ता.भोसले प्रादेशिक साहित्याविषयी म्हणतात, ''प्रादेशिक साहित्याच्या दृष्टिने एक भौगोलिक असा संपूर्ण प्रदेश, एक संपूर्ण निसर्गपट महत्वाचा ठरलेला असतो. संपूर्ण प्रदेशाचे मिळून जे लोकजीवन साकार झालेले असते, ते प्रादेशिक साहित्यात महत्वाचे असते. या लोकजीवनाला निसर्गाचे न पुसले जाणारे रंग लाभलेले असतात. त्या प्रदेशाने तिथल्या मनाला आकार दिलेला असतो. म्हणून प्रदेशाचे चैतन्यरूप आणि त्या प्रदेशातून साकार झालेल्या समाजमनाचे चैतन्य जिथे



Electronic copy available at: https://ssrn.com/abstract=3484328

एकात्म स्वरूपात व्यक्त झाले आहे, असे प्रतीत होते त्या साहित्याला 'प्रादेशिक साहित्य' म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.'' ग्रामीण साहित्यापेक्षा प्रादेशिक साहित्याचे वेगळेपणच लेखक यातून सुचित करतात.

प्रादेशिक कादंबरी विषयी आपली भूमिका मांडतांना डॉ.आनंद यादव म्हणतात, '' एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंकेत,चालीरिती, समूहाच्या भावभावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या मानवी जीवननाटय यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जात त्यांना प्रादेशिक कादंबऱ्या असे म्हटले जाई'' प्रादेशिक कादंबरीतील लोकजीवन काहीसे प्रातीनिधीक स्वरूपाचे असावे अशी अपेक्षा असते. प्रादेशिक कादंबरीमध्ये सामूहिकता, प्रातीनिधीकता, व सांस्कृतिक जीवन यालाही महत्वाचे स्थान असते. त्याशिवाय साहित्यातील प्रादेशिकता पूर्णपणे व्यक्त होत नाही. मानवी जीवनाचा संदर्भच प्रदेशाशी, लोकसंस्कृतीच्या, लोकपरंपरेच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असतो.

प्रादेशिक कादंबरीत साकारला गेलेला प्रदेश, प्रादेशिक मूल्यांचा लोक संस्कृतीशी येणारा संबंध, शहरी जनजीवन प्रादेशिकतेच्या कक्षेत कितपत सामावू शकतो हा विचारही प्रादेशिक कादंबरीत महत्वाचा ठरतो. या संदर्भत डॉ. आनंद यादव यांचे विवेचन अत्यंत महत्वाचे आहे. ते म्हणतात ''शहरी जीवन कमी अधिक प्रमाणात त्या त्या प्रदेशापासून मनाने तुटून वैश्विक संस्कृतीची बेटे झालेले असल्याने ते प्रादेशिक वैशिष्टय संपूर्णपणे नव्हे तर मोठया प्रमाणात गमावून बसलेले असते. म्हणून प्रादेशिक कादंबरीत त्या त्या प्रदेशातील अशा संस्कृतीचे जीवन वर्ज्य करावे लागते, म्हणून असे म्हणता येईल की, 'प्रादेशिक' हा शब्द वापरताना त्या–त्या प्रदेशातील 'ग्रामीण' स्वरूपाचे लोकजीवन असा अर्थ अभिप्रेत असतो. त्यामुळे अशा स्वरूपाच्या कादंबरीला शेवटी 'प्रादेशिक' कादंबरी मानावी लागते.'

डॉ.द.भि. कुळकर्णी यांच्या मते'प्रादेशिक कादंबरी' हा ग्रामीण कादंबरीचा अधिक वास्तवपूर्ण आविष्कार होय, असे आपण मानतो आणि म्हणूनच भौगोलिकदृष्टया अस्तित्वात असलेला एक वैशिष्टयपूर्ण निसर्ग यांची अपेक्षा आपण प्रादेशिक कादंबरीकडून करीत असतो. या अपेक्षेला धरूनच प्रादेशिक कादंबरीत निसर्गसृष्टी हवी, ते महत्वाचे पात्र व्हावे, असे आपण मानतो. परंतू एवढयाने भागत नाही. प्रादेशिक कादंबरीत प्रादेशिक मनाचा सामुदायिक गजर ऐकू यावा लागतो. अनेक प्रादेशिक कादंबऱ्यामधून भौगोलिक पार्श्वभूमी व वातावरणाला प्राधान्य दिलेले आढळते. किंबहुना, प्रदेश म्हणजे जणू एक पात्र या पध्दतीने तो प्रादेशिक कादंबरीतून व्यक्त होतो.

<u>**प्रादेशिक कादंबरी आणि ग्रामीण कादंबरी :–**</u>

प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरीचे नाते फार जवळचे आहे. प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरीचे प्रवाहही कित्येकदा एकमेकात मिसळलेले दिसतात. मात्र दोन्ही प्रकारच्या कादंबऱ्यामध्ये जनजीवनाला महत्वपूर्ण स्थान असते. या दोन्ही कादंबऱ्यामधील वेगळेपणाची जाणीव विषद करताना डॉ.आनंद यादव म्हणतात, ''ग्रामीण साहित्य व्यक्तीनिष्ठ असते तर प्रादेशिक साहित्य समूहनिष्ठ असते. प्रादेशिक साहित्यातून समूहभावना अत्यंत प्रभावीपणे व्यक्त होत असते.'' ''ग्रामीण आणि 'प्रादेशिक' कादंबऱ्यामधील सीमारेषा ठरविण्याविषयी 'अक्षरवाटा'मध्ये म.सु.पाटील म्हणतात, ''ज्याला आपण 'ग्रामीण' म्हणतो ते जीवन प्रादेशिकतेइतके निसर्गनियत नसते. ग्रामीण जीवन हे ग्रामीण व्यवसाय आणि ग्रामसंस्था, वृत्ती–प्रवृत्ती यांच्याशी निगडीत अशा भावभावना यापेक्षा समाजमान्य चौकटीतील भावजीवन अधिक दृगोचर होते. प्रादेशिक कादंबऱ्यातील पात्रांच्या वृत्तीप्रवृत्तीवर प्रदेशाचे संस्कार जितके असतात ते 'ग्रामीण' कादंबरीतील पात्रांवर नसतात. त्यांची वैचारिक घडण, त्यांची स्वत:ची अशी मानसिकता महत्वाची असते. तिच्यावर निसर्गापेक्षा भोवतालच्या परिस्थितीमधील इतर घटकांचा वाटा अधिक असतो.''

तुलनात्मकदृष्टया विचार करता 'प्रादेशिक' कादंबरी आणि 'ग्रामीण' कादंबरी यामध्ये फरक दिसून येतो. तो म्हणजे प्रादेशिक कादंबरी प्रदेशाधिष्ठित असते. कुठला तरी प्रदेश या कादंबरीच्या मुळाशी असतो. शिवाय ही समूहनिष्ठ असते. प्रादेशिक कादंबरीला त्या त्या प्रदेशाच्या बोलीमुळे आविष्कारात्मक वैशिष्टय प्राप्त हाते. प्रादेशिक बोली ही त्या प्रदेशातील लोकजीवनाचाच एक भाग असतो. तिच्यातून तेथील लोकजीवन, लोकमानस व्यक्त होते असते. प्रादेशिक कादंबरी ही प्रदेशाधिष्ठीत असते. तिच्या या स्वरूपामुळे तिला मर्यादा पडताना दिसून येतात. कारण या कादंबरीत प्रदेशाला महत्व असल्यामुळे तिच्या कक्षा त्या प्रदेशापुरत्या मर्यादित राहतात. मात्र, ग्रामीण कादंबरीच्या संदर्भात अशी मर्यादा नाही. विस्तृत, विस्तीर्ण जीवनाचे दर्शन ग्रामीण कादंबरीकार घडवू शकतो, असे म्हणता येईल. 'प्रादेशिक' कादंबरीपेक्षा 'ग्रामीण' कादंबरीच्या जीवनाचे क्षेत्र अधिक व्यापक आहे.

डॉ.आनंद यादव यांनी 'प्रादेशिक वाङ्मयात त्या त्या प्रदेशातील ग्रामविभागाचे समूह दर्शन अभिप्रेत असते आणि 'ग्रामीण' वाङ्मयात त्या त्या विभागातील व्यक्तीनिष्ठ जीवन अभिप्रेत असते, असे सांगून 'प्रादेशिक' व 'ग्रामीण' साहित्यात फरक केला आहे. त्यांनी प्रादेशिकतेचा कादंबरीशी आणि कथेचा ग्रामीणतेशी संबंध दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, प्रादेशिक समजली जाणारी सर्व चित्रणे, ग्रामविषयक चित्रणेच असतात. या



Electronic copy available at: https://ssrn.com/abstract=3484328

ग्रामसमूहामधूनच प्रदेश वैशिष्ट्ये जाणवतात म्हणजेच ग्रामविषयक चित्रणे ही प्रदेशचित्रणेही असतात. म्हणून प्रादेशिकतेचा अर्थ ग्रामीण भूप्रदेशात असाच घेणे योग्य ठरते. 'प्रादेशिकता' ही ग्रामीण परिसराशी अविभाज्यपणे निगडीत झालेली असते. म्हणून 'परिसर' म्हणजे 'प्रदेश' हे मान्य असल्यास 'ग्रामीण' व 'प्रादेशिक' या दोन्ही संज्ञा तशा समानार्थीच आहेत, हे मधु कुळकर्णी यांचे मत यथार्थ वाटते. तात्पर्य, ग्रामीण साहित्य किंवा ग्रामीण कथा कादंबऱ्या असा शब्द प्रयोग न करता ग्रामविषयक साहित्याचा समावेश 'प्रादेशिक' हया संज्ञेतच करणे उचित होईल.

प्रादेशिकतेचे ग्रामीणत्वाशी निश्चितच काही बाबतीत साम्य असते. परंतु या दोन्ही संज्ञा एकच नव्हे, कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला—ग्रामसंस्कृतीला फारसे महत्व देत नाही. तर ते विशिष्ट प्रदेशाच्या समग्र टप्प्याला महत्व देते. कधी ग्रामजीवन आलेच तर ते स्वतंत्रपणे येत नाही. ते त्या प्रदेशातील समग्र संस्कृतीचा एक भाग म्हणून येते. ग्राम संस्कृतीपेक्षा त्या प्रदेशाचा टापू अधिक महत्वाचा असतो. त्या दृष्टीने प्रादेशिक साहित्यातून व्यक्तीकेंद्रितता दिसत नाही तर 'समूहकेंद्रितता' हे या साहित्याचे वैशिष्टय आहे.

प्रादेशिक कादंबऱ्या लिहिताना कादंबरीकारांनी विशिष्ट प्रांतभागाच्या पार्श्वभूमीचा विचार केलेला दिसतो. श्री.ना. पेंडसे यांनी 'गारंबीचा बापू', 'एल्गार' इ. कोकणच्या प्रदेशावर आपल्या कादंबऱ्या लिहून एक यशस्वी प्रादेशिक कादंबरीकार म्हणून नावलौकिक मिळविला आहे. या कादंबऱ्यामध्ये व्यक्तीविशेषाला महत्व नसून संबंध प्रदेशातील सामाजिक संबंधांना महत्वाचे स्थाने दिले आहे. स्वानुभव,समरसता व प्रदेशातील जीवनाबद्दल सहानुभूती या गोष्टींमुळे त्यांच्या कादंबऱ्या वास्तव आणि प्रभावशाली झाल्या आहेत. गो.नी.दांडेकर यांनी प्रादेशिक कांदबरीची मालिकाच लिहिली. 'सेतू', 'पवनाकाठचा धोंडी', 'पडघवली', 'पूर्णामायची लेकरं' 'माचीवरचा बुधा', 'मृण्मयी', इ. बा.भ.बोरकर यांची 'भावीण',व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी', 'वावटळ', उध्दव शेळके यांची 'धग', शंकर पाटील यांची 'टारफुला' आनंद यादव यांची 'गोतावळा' रा.रं.बोराडे यांची 'पाचोळा' ना.धो. महानोर यांची 'गांधारी' महादेव मोरे यांची 'पावना' अशा अनेक कादंबऱ्यामधून त्या त्या प्रदेशातील ग्रामीण जीवनाचे अंग साकारले नव्हे, प्रादेशिक कादंबरीचा प्रवाह त्यांनी समृध्द केला आहे.

'प्रादेशिकता' एका बाजूने वास्तवतेची व्याप्ती व दुसऱ्या दृष्टीनी लेखकाच्या 'नाविन्यांच्या' नैसर्गिक इच्छेतून निर्माण झाली आहे. मराठी कादंबरी मध्यमवर्गाच्या, शहरी जीवनाच्या प्रणयाच्या, जीवनवादी उपदेशाच्या, चौकटीत अडकून पडली होती. ही चौकट रसिक वाचकाला विलक्षण कंटाळवाणी होऊ लागली. तेच तेच अनुभव वाचून वीट आलेल्या वाचकांसाठी लेखकांनी ही कोंडी फोडली. साहित्यात यापूर्वी न पाहिलेले जीवन, न पाहिलेली माणसे व न वापरलेली भाषा आल्यामुळे कादंबरी विश्व नवचैतन्याने भरून गेले. या प्रादेशिकतेमुळेच पूर्वी गुरफटून राहिलेली तांत्रिक बंधने सैल झाली. समुदायाचे चित्रण प्रभावीपणे झाले. आता प्रादेशिक कादंबरी आपल्या लोकप्रियेतेची चरमसीमा ओलांडून पुढे जात आहे.

सुखटणकर, र.वा.दिघे, श्री.ना.पेंडसे, व्यंकटेश मागडगूळकर, आनंद यादव यांच्या पासून मराठी प्रादेशिक कादंबरीची झालेली वाटचाल विश्वास पाटलांच्या 'झाडाझडती' मुळे अधिक समृध्द झाली आहे. पाश्चात्य शैली तंत्राचा वापर करणारी शहरी कादंबरी, आपल्या देशी जीवनातील आंतर्बाहय चित्र काढणारी प्रादेशिक कादंबरी आणि दलित कादंबरी आज प्रतिष्ठित होताना दिसत आहे. आज आपली वाङ्मयीन संस्कृती आपल्या देशीपणाकडे, या जीवनातील प्रश्नांकडे गौरवाने लक्ष देत आहे. मराठी मातीच्या गंधाशी नाते सांगणारी प्रादेशिक कादंबरीची वाटचाल विकासाच्या मार्गाने सुरूच आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. ल.ग.जोग, कादंबरी

२. आनदं यादव, ग्रामीण साहित्य: स्वरूप समीक्षा

३ नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि शोध.

४ द.ता.भोसले, ग्रामीण साहित्य : एक चिंतन, मेहता पब्लिसींग हाऊस, पुणे:३०, प्रथमावृत्ती १९८८.

५ द.भि.कुळकर्णी, तिसऱ्यांदा रणांगण

६. मा.ना.कागणे, मराठी प्रादेशिक वाङ्मय, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९६.

❑❑❑



Electronic copy available at: https://ssrn.com/abstract=3484328